# ग्रामीण स्त्रियांचे शिक्षण

**प्रा.भोसले ए.आर**

**समाजशास्त्र विभाग प्रमुख,**

**बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज.**

**ता.केज.जि.बीड.**

प्रस्तावना :-

प्रारंभीच्या काळात शिक्षण ही एक कला असल्याचे मानले जात असे, परंतु पुढे विविध शास्त्रंाच्या प्रगतीचा शिक्षणविषयक विचारावर जेव्हा प्रभाव पडला तेव्हा शिक्षण हे कलेबरोबर शास्त्रदेखील आहे असे मानले जाऊ लागले.

ग्रामीण समाजातील परिवर्तनासाठी स्त्रीस शिक्षण दिले तर, ग्रामीण समुदयाचा विकास होण्यास विलंब लागणार नाही. हजारो वर्षापासून ग्रामीण समाज हा मागसलेला असुन तो शहरी समुदयाच्या तुलनेत प्रगतीच्या व परिवर्तनाच्या प्रक्रियेत फार मागे आहे. सामाजिक परिवर्तनासाठी ग्रामीण स्त्रियांना साक्षर बनविणे गरजेचे आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक महत्वपुर्ण साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास साधता येतो. हे ओळखुन स्वातंत्र्यपुर्व काळापासून आनेक समाजसुधारकांनी ग्रामीण स्त्रि शिक्षणाची चळवळ सुरु केली. सॉक्रीटस, प्लेटो, ऑस्टिॅटल, कामेनियस रुसो, हर्बर्ट स्पेन्सर मादाम मॉन्टेसरी, महात्मा गांधी, रवीन्द्रनाथ टागोर, महात्मा जोतीबा फुले यासारख्या थोर महापुरुषांनी आपली ग्रामीण स्त्री शिक्षण तज्ञांनी मते मांडली आणि ग्रामीण भागातील वैदिक कालखंडामध्ये स्त्रीपुरुष समानता होती. परंत मध्यमयुगाच्या कालखंडात ही समानता नष्ट होऊन धर्माने स्त्रियांच्या शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. त्यामुळे स्त्री अज्ञानाच्या अंध : कारात आणि सनातनी समाजाच्या सामाजिक प्रथा परंपरागत बंधनात जीवन जगत होती.

ग्रामीण समाजामध्ये स्त्रिस शिक्षणापासून वंचीत रहावे लागत आहे. यामुळे ग्रामीण समाजातील स्त्रियावर आन्याय - आत्याचार होत आहेत. आन्यायाविरुध्द लढण्यासाठी ग्रामीण स्त्रीस शिक्षण देणे आवश्यक आहे. ग्रामीण स्त्रीच्या मनातील ही जाणीव कमी होत असुन ती बोथट होत आहे. ही जाणीव ग्रामीण स्त्रिमध्ये शिक्षणाच्या साहाय्याने निर्माण होऊ शकते. स्त्रीस्वातंत्र्यपुर्व काळापासुन स्त्री शिक्षणाची ही चळवळ महात्म जोतीराव फुले सावित्रीबाई फुले महर्षी धोंडे केश्व कर्वे या समाज सुधारकांनी केली या ज्ञानरुपी चळवळीच्या वृक्षला आलेले कळ म्हणजे कल्पना चावला व सुनिता विल्यास यांचे शौक्षणिक कार्ये मोलाचे आहे.

शिक्षण हा देशाचा समाजाचा व व्यक्तीच्या जीवनाचा गाभा आहे. एकदा समाज सुसंकृत आणि पुरोगामी आहे हे कमी करा त्या समाजात स्त्री शिक्षणाला दिलेल्या नावावरुन ठरते. स्त्रियांच्या विकासावर समाजाचा विकास अवलंबुन असतो. आज ग्रामीण समाज विकासाच्या दुष्टिकोनातून फार मागे आहे. कारण शिक्षणाचे प्रमाण ग्रामीण भागामध्ये कमी आहे. एक स्त्री शिकली तर संपुर्ण कुटूंबच साक्षर होते. या दृष्टीने ग्रामीण स्त्रिस शिक्षण देणे गरजेचे आहे.

संशोधनाची उदिष्टये :-

१. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये स्त्रियांच्या विकासाचा आढावा घेणे.

२. ग्रामीण भागामध्ये स्त्री शिक्षणातील उणिवा जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

प्रस्तुत लघुशोध निबंध हा दुय्यम स्वरुपाच्या माहितीवर अधारलेला आहे सदरची माहिती हा विविध संदर्भ पुस्तके, मासिक, शोध निबंध याच्या साहाय्याने मिळविलेली आहे. या शोध निबंधामध्ये शिक्षणाच्या माध्यमातुन ग्रामीण स्त्रिमध्ये घडून आलेल्या विकासाचा आढावा घेण्यात आला आहे.

गृहितके :

१. भारतीय समाजात आजही महीलांच्या बाबतीत गौरसमज मोठया प्रमाणात आहेत.

२. ग्रामीण समाजात स्त्रिस पुरुषापेक्षा दुय्यम स्थान आहे.

३. ग्रामीण स्त्रीस आजही आनेक समस्यांना तोड द्यावे लागते.

अभ्यासाचे महत्व :-

मानवाचे संस्कारमय आणि संस्कारपूर्ण जीवन घडविण्यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण आहे.त्यामुळे ग्रामीण विकासाच्या आणि पर्यायाने समाजिक विकासाच्या दृष्टीने शिक्षणाला महत्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण स्त्रियांच्या दृष्टीने तर शिक्षण हा परिवर्तन घडवून आणणारा हा एक महत्वाचा घटक आहे.शिक्षणामुळे ग्रामीण स्त्रियांच्या जिवनातील शक्तीची खरी ओळख झालेली आहे. त्यातूनच त्यांच्या जीवनात प्रगती होत आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांनची संख्या प्रत्येक क्षेत्रामध्ये दिसुन येत आहे. याचा आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे.

१. स्त्री व्यक्तीमत्वाचा विकास:-

शिक्षणामुळे ग्रामीण स्त्री व्यक्तीमखाचा विकास हा विविध मार्गाने, मानवतावादी मुल्ये, जीवन-विषयक दृष्टीकोन, चांगले आचार-विचार संस्कार, वर्तणुक, सहकार्य, बंधुभाव, शिस्त आणि घटक रुजविण्याचा कार्य शिक्षण करत आहे.

२. ग्रामीण भागामधील स्त्रिस शिक्षणामुळे स्वत:ची ओळख व अस्तित्वाची जाणिव होत असुन ती पुरुषाबरोबर रहाऊन कार्य करत आहे.

३. सामाजीक स्थानातील परिर्वन: वौदिक कालखंडामध्ये ते बंद करुन ग्रामीण स्त्रिस बंधनामध्ये रहाऊन जिवन जगावे लागत असे, परंतु स्वातंत्र्यानंतर ग्रामीण स्त्रिस शिक्षण देऊन समाजातील स्थान उंचावलेले आहे.

४. विविध मुल्ये आणि मुलभुत हक्कांची जाणीव सुसंस्कारीत पिढी घडविण्यात यश : ग्रामीण स्त्रीस शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिल्यामुळे समता स्वातंत्र्या, बंधुत्व स्त्री-पुरुष समानता, राष्ट्रप्रेम, समुदाय जीवन, सहकार्य, बंधुभाव, व मानवतावादी मुल्य, मुलांचे पालन पोषण संगोपन आणि संस्कारामय पिढी घडविण्यामध्ये स्त्रि जर सुक्षित असेल तर चांगल्या प्रकारचे कार्ये होऊ शकते.

५. सामाजिक प्रश्न सोडवण्यात महिलांची भुमिका :-

स्त्रि शिक्षण आणि विविध सामाजिक समस्या यांचा निकटचा सबंध आहे. स्त्रि शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रियांमधे लोक संख्या हुंडाबळी, स्त्री अत्याचार, बालमृत्यू स्त्री भ्रणहत्या आरोग्य दारुबंदी, एडस, भष्टाचार इ. सामाजिक समस्यांची जाणीव स्त्री शिक्षणामुळे होते.

६. विविध क्षेत्रातील सहभाग व स्वालंबन आणि स्त्री नेतृत्व :- स्त्रि शिक्षणामुळे विविध क्षेत्रात सहभागी होऊन ती स्वावलंबी बनुन ती एक सामाजिक नेतृत्वात अग्रेसर होऊ शकते.

स्त्री शिक्षणातील उणिवा :-

१. कौटुंबिक उणिवा :- आजही मुलींना कुटुंबात गौण स्थान आहे. ती परक्याचे धन समजून तिच्याचर घरकाम भांवडांचा संभाळ करणे. यामुहे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

२. समाजिक उणिवा:- मुलगा हा वंशच्या दिवा, म्हातारपणाचा आधार म्हणून मुलीपेक्षा मुलगा श्रेष्ठ समजाला जातो. याच्या परिणाम पण मुलीच्या शिक्षणावर होत रहातो.

३. आर्थिक उणिवा : आजही भारतामध्ये ग्रामीण भागात ३० ऽ लोकसंख्या ही दारिद्रयामध्ये जीवन जगत आहे. म्हणून त्यांच्या शिक्षणासाठी पौशाची उणिव आसुन मुलांना जासत खर्च केला जातो .

४. मुलींची गळती : ग्रामीणभागात शिक्षणामध्ये गळतीचे प्रमाण अधिक आहे. त्यांना घरकाम, शेतीकाम व इतर व्यवसायामध्ये काम करावे लागते व त्यांना शिक्षणापासुन वंचित रहावे लागते.

५. उच्च शिक्षणात ग्रामीण भागातील मुलींचे प्रमाण कमी असुन त्याविषयीचा दृष्टिकोन वेगळा आहे.

उपाययोजना :-

१. सामाजिक प्रोबोधन करुन मुलांमुलीनचा समान दर्जा किती आवश्यक आहे हा संस्कार करणे अवश्यक आहे.

२. सर्व माध्यमांचा व साधनांचा वापर करुन ग्रामीण स्त्रीस शिक्षणाचे महत्व पटऊन देण्यासाठी सामाजिक प्रबोधनावर भर द्यावा.

३. ग्रामीण भागातील मुलींना शाळेत मोफत साहित्य पुरवावे तसेच मुलींची संख्या कसी वाढेल यावर विचार करावा.

४. ग्रामीण भागामध्ये जी माध्यमे, व्यक्ति व वर्तमानपत्रे स्त्रिशिक्षणाचा प्रचार व प्रसार करतात त्यांचा सत्कार करुन बक्षिस द्यावे.

५. राजकिय पक्षांनी स्त्री शिक्षणाला चांगले प्राधान्य द्यावे.जेणे करुन राष्ट्राची उभारणी चांगली मजबूत होईल.

६. उच्चशिक्षणात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांना जास्ती-जास्त शिष्यवृत्ती देण्यात यावी.

निष्कर्ष :-

ग्रामीण भागामध्ये स्त्रि शिक्षामुळे संपुर्ण ग्रामीण भागाचा विकास होत आहे. प्रत्येक कुटूंबातील मुलगी जमेल तेवढे तसेच जसी सोय असेल त्याप्रमाणे शिक्षण घेत आहे. स्त्री शिक्षण आणि त्यातुन स्वावलंबन हा ग्रामीण स्त्रीच्या प्रगतीमधील एक पर्यायाने सामाजिक विकासाचा पाया आहे. हे ओळखूनच प्रा.महम्मद युनूस यांनी निर्मिलेली ग्रामीण ब्ॉक स्वयम शिक्षण प्रयोग या सारख्या सामाजिक संस्था आणि लाखो बचत गटांनी स्त्रियांना स्वावलंबी बनवून ग्रामीण समाजाचा विकास घडवून आणला आहे. ग्रामीण स्त्री ही शिक्षणातून एक मजबुत बनत चालली आहे.

संदर्भ सूची :-

१.प्रतिमा इंगोले :- आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच,दिलीपराज प्रकाशन, पुणे २००१.

२. रा.तु.भगत-उषय : काल उद्याच्या शिक्षणाचा, चौतन्य प्रकाशन, कोल्हापूर, १९९४.

३. डॉ. विजयावाड- त्या होत्या म्हणून, अनुश्री प्रकाशन, पुणे २००७.

४. डॉ. दा.धो.काचोळे- ग्रामीण नागरी समस्या, कैलास, पब्लिकेशन्स, औरंगाबाद २०१४.

५. डॉ. गुरुनाथ द.नाडगोंडे- ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्अल प्रकाशन विजयानगर, पुणे ३०,२००२.